## प्रसिध्दी पत्रक

## श्री. रविंद्र प्रतापसिंग राजपुत, लिपीक, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण - फुलंब्री, औरंगाबाद यांच्या वर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री. रविंद्र प्रतापसिंग राजपुत, वय वर्षे, व्यवसाय लिपीक, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण - फुलंब्री, औरंगाबाद रा. राजेसंभाजी कॉलनी, जाधववाडी, औरंगाबाद. |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक १२/०६/२०१८ रोजी बीएसएनएल कार्यालय, मुंकूंदवाडी औरंगाबाद येथील उपहारगृहच्या समोरील पॅसेज मध्ये |
| लाचेची रक्कम | :- | ६,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या मालकीची डीएमआयसी करीता संपादीत झालेल्या जमीनीची संचीका तयार करुन त्याचे बील ट्रेझरीला पाठविण्यासाठी |

यातील तक्रारदार हे शेती व्यवसाय करतात. तक्रारदार यांची गट नंबर १०६ मौजे जांभळी शिवारामध्ये जमीन असुन सदरची जमीन डीएमआयसी करीता शासनाकडुन संपादीत करण्यात आलेली आहे. जमीन संपादनाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर शेतात असलेले झाडे व विहीरचा मावेजाचा चेक मिळणारा होता. सदर मावेजाचा चेकचे काम श्री. रविंद्र प्रतापसिंग राजपुत, लिपीक, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण- फुलंब्री औरंगाबाद यांच्याकडे असल्यामुळे श्री. रविंद्र राजपुत यांनी तक्रारदार यांची जमीनीची संचीका तयार करुन त्याचे बील ट्रेझरीला पाठविण्यासाठी १०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना श्री. रविंद्र प्रतापसिंग राजपुत, लिपीक, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण- फुंलब्री औरंगाबाद यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.११/०६/२०१८ रोजी श्री. रविंद्र प्रतापसिंग राजपुत, लिपीक, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण- फुंलब्री औरंगाबाद यांच्याकडे पंच साक्षीदारासमक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, श्री. राजपुत यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,०००/- रु लाचेची मागणी करून, तडजोडी अंती ६,०००/- रु लाचेची मागणी केली. त्यावरुन दि.१२/०६/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्यात आला असता, तक्रारदार यांचेकडून श्री. रविंद्र प्रतापसिंग राजपुत, लिपीक, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण- फुंलब्री औरंगाबाद यांनी पंच साक्षीदारा समक्ष ६,०००/- रुपये लाचेची रक्कम बीएसएनएल कार्यालय, मुंकूंदवाडी औरंगाबाद येथील उपहारगृहच्या समोरील पॅसेज मध्ये स्विकारली आहे.

तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४
Mail ID :- dyspacbaurangabad@mahapolice.gov.in
dyspacbabad@gmail.com.

पोलीस उप अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

(किशोर चौधरी)
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.